**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**बुधवार दिनांक ३० एप्रिल २०२५**

**ठळक बातम्या**

1. जातनिहाय जन गणना करण्याचा केंद्रीय मंत्रिमंडळाचा निर्णय.

2. वेव्हज अर्थात पहिल्या जागतिक दृक्श्राव्य मनोरंजन शिखर परिषदेला उद्यापासून मुंबईत सुरुवात, पंतप्रधान नरेंद्र मोदी करणार उद्घाटन.

3. अक्षय्य तृतीयेच्या सणाचा आज सर्वत्र उत्साह, नवीन खरेदीची बाजपेठेत रेलचेल, यवतमाळ मध्ये रोखले 2 बालविवाह.

4. नागपूर येथील 'मल्टी मोडल लॉजिस्टिक पार्क'मध्ये व्यावसायिक संचालनास प्रारंभ.

5. भाजपचे विधान परिषदेचे माजी आमदार डॉ. रामदास आंबटकर यांचं निधन.

---------------------------------------------

**जाति निहाय जनगणना**

येणाऱ्या जनगणनेत जाति निहाय जनगणना समाविष्ट करण्याचा निर्णय आज पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत झालेल्या केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत आज घेण्यात आला. केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी या बाबत एका पत्रकार परिषदेत माहिती दिली. -

*सारा सामाजिक तानाबाना राजनीति के दबाव में न आए। जातियों की गणना एक सर्वे के स्थान पर मूल जनगणना में ही सम्मिलित होनी चाहिए। इससे यह सुनिश्चित होगा कि समाज आर्थिक और सामाजिक दृष्टि से मजबूत होगा और देश की प्रगति भी निर्बाध चलती रहेंगी।आज दिनांक 30/4/2025 के दिन प्रधानमंत्री श्री नरेंद्र मोदी जी के नेतृत्व में राजनीतिक विषयों की कैबिनेट समिति ने यह निर्णय लिया है। जातियों की गणना को आने वाली जनगणना में सम्मिलित किया जाए।*

---------------------------------------------

**वेव्हज**

मुंबईत उद्यापासून ‘वर्ल्ड ऑडिओ व्हिज्युअल एंटरटेन्मेंट समिट’ - वेव्हज संमेलनाला प्रारंभ होत आहे. वांद्रे कुर्ला संकुलात जिओ वर्ल्ड सेंटरमध्ये आयोजित या परिषदेचं, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत उद्घाटन होणार आहे. चार मे पर्यंत चालणाऱ्या या परिषदेत जगभरातून शंभर पेक्षा जास्त देश सहभागी होणार असून, विविध विषयांवर चर्चासत्रं, आणि अनेक कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत.परिषदेच्या पहिल्या दिवशी ‘भारत आणि महाराष्ट्र पॅव्हिलियन’ तसंच वेव्हज प्रदर्शनाचं उद्घाटन होणार असून, काही महत्त्वपूर्ण घोषणा आणि सामंजस्य करार करण्यात येणार आहेत. या परिषदेच्या माध्यमातून देशातल्या सर्जनशील अर्थव्यवस्थेला मोठ्या प्रमाणात चालना मिळण्यास मदत होणार आहे.वेव्हज २०२५ या कार्यक्रमाच्या थेट प्रसारणामुळे, रात्री ८ वाजून ५ मिनिटांनी प्रसारीत होणारं मराठी राष्ट्रीय बातमीपत्रं आजपासून ४ मे पर्यंत रात्री साडेआठ वाजता प्रसारीत होईल. बातमीपत्राच्या वेळेतला हा बदल ३० एप्रिल ते ४ मे या कालावधीपुरताच आहे.

------------------------------------------

अक्षय्य तृतीया/ बालविवाह

साडे तीन मुहूर्तापैकी एक असलेली अक्षय्य तृतीया आज साजरी होत आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी देशवासियांना अक्षय्य तृतीयेच्या शुभेच्छा दिल्या आहेत. हे पर्व सगळयांसाठी यश, वृद्धी आणि प्रसन्नता घेऊन येवो, असं त्यांनी शुभेच्छा संदेशात म्हटलं आहे. महात्मा बसवेश्वर जयंती आज साजरी होत आहे. समाजाप्रति महात्मा बसवेश्वर यांचा दृष्टीकोन आणि उपेक्षितांच्या उत्थानासाठी त्यांनी केलेले प्रयत्न आजही समाजाला मार्गदर्शन करत असल्याचं सांगत, प्रधानमंत्री मोदी यांनी बसवेश्वर जयंतीच्या शुभेच्छा दिल्या.या शुभदिनी आपल्या जीवनात नवचैतन्य येवो, उत्तम आरोग्य, सुख-समृद्धीने संपूर्ण वर्ष जावो, अशा शब्दात मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी सर्वांना अक्षय्य तृतीयेच्या शुभेच्छा दिल्या आहेत. आपणा सर्वांच्या आयुष्यात अक्षय्य सुख-समृद्धी, धन संपदा नांदो अशा शब्दांत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सर्वांना अक्षय्य तृतीयेच्या शुभेच्छा दिल्या आहेत. तर अक्षय्य तृतीयेच्या मंगलदिनी घरोघरी लक्ष्मीचा सदैव वास राहो, अक्षय्य सुख-समृद्धी, यश, ऐश्वर्य, शांती आणि उत्तम आरोग्य लाभो, अशा शुभेच्छा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिल्या आहेत. वीरशैव लिंगायत संप्रदायाचे संस्थापक, महान समाज सुधारक, विश्वगुरु महात्मा बसवेश्वर महाराज यांना जयंतीनिमित्त मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांनी अभिवादन केलं आहे. चार धाम यात्रेलाही आजपासून सुरुवात झाली. अक्षय्य तृतीयेच्या पार्श्वभूमीवर

उत्तराखंडमध्ये उत्तरकाशी जिल्ह्यात गंगोत्री आणि यमुनोत्री धामचे दरवाजे पारंपरिक पद्धतीनं उघडण्यात आले असून, केदारनाथ धामचे दरवाजे शुक्रवारी उघडतील आणि बद्रीनाथ धामचे दरवाजे रविवारी उघडतील.अक्षय तृतीयेनिमित्त यवतमाळ मध्ये होणारे दोन बालविवाह रोखण्यात यवतमाळ प्रशासनाला यश आले आहे. बालविवाहाचा प्रयत्न झाल्यास सर्व संबंधितांवर तत्काळ कायदेशीर कारवाई करावी, असे सक्त निर्देश जिल्हाधिकारी विकास मीना यांनी दिले असून बाल विवाह रोखण्यास मदत करण्याचे आवाहन केले आहे-

*प्रत्येक कॉलेज आणि स्कूलचे टीचर्स आहे. आपले लग्न मंडळाचे संचालक आहे.ब्युटी पार्लरचे ऑपरेटर आहे. केटरिंग व्यवसायामध्ये जे लोक आहे आपले मंदिराचे जे पंडित आहे आणि आपले मौलवी आहे त्यांना माझी विनंती देणार आहे. की जर बालविवाह संदर्भात कोणीही आपल्याकडे आला तो त्याच्या संदर्भात जिल्हा प्रशासनाला माहिती द्यावं.*

---------------------------------------------

भूषण रामकृष्ण गवई

सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश, न्यायमूर्ती भूषण रामकृष्ण गवई हे भारताचे पुढचे सरन्यायाधीश असतील. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी न्यायमूर्ती गवई यांची भारताचे सरन्यायाधीश म्हणून नियुक्ती केली आहे. पुढील महिन्याच्या १४ तारखेपासून ते आपला कार्यभार सांभाळतील, अशी माहिती केंद्रीय कायदा आणि न्यायमंत्री अर्जुन राम मेघवाल यांनी दिली.

---------------------------------------------

लॉजिस्टिक्स पार्क

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'पीएम गतिशक्ती' या महत्त्वाकांक्षी उपक्रमाअंतर्गत आणि केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्या मार्गदर्शनाखाली, नागपूर येथील वर्ध्याजवळ सिंदी येथे उभारण्यात आलेल्या 'मल्टी मोडल लॉजिस्टिक्स पार्क लिमिटेड' या प्रकल्पान जलद आणि कार्यक्षम वाहतुकीची साखळी निर्माण करण्याच्या उद्देशाने आपले व्यावसायिक संचालन सुरू केले आहे. शेवटच्या टप्प्यापर्यंतची जोडणी सुधारण्यास तसेच प्रवासाचा वेळ कमी करण्यास मदत होते. राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाची 100 टक्के मालकीची कंपनी असलेल्या राष्ट्रीय महामार्ग लॉजिस्टिक्स मॅनेजमेंट लिमिटेड ने स्थापन केलेल्या एमएमएलपी नागपूरला नुकतेच फरूखनगर येथून 123 मारुती कार्सचा पहिला रेल्वे रेक प्राप्त झाला, आणि ही गोष्ट या सुविधेसाठी एक महत्त्वपूर्ण उपलब्धी ठरली.

---------------------------------------------

महाराष्ट्र दिन उद्या

महाराष्ट्र राज्य स्थापना दिनाचा ६६ व्या वर्धापन दिन म्हणजेच महाराष्ट्र दिन उद्या साजरा होत आहे. यानिमित्त ठिकठिकाणी ध्वजारोहणासह विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे.

---------------------------------------------

सीताबर्डी किल्ला

नागपूरचा प्रसिद्ध सीताबर्डी किल्ला उद्या 1 मे रोजी सकाळी ९ ते दुपारी ४ या वेळेत जनतेसाठी खुला असेल. ओळखीचा वैध पुरावा सादर करून स्टेशन कँटिन गेट, किंगसवे हॉस्पिटल विरुद्ध असलेल्या गेटमधून किल्ल्यात प्रवेश देण्यात येईल अशी माहिती डिफेन्स जनसंपर्क अधिकार्यातर्फ़े देण्यात आली आहे.

---------------------------------------------

डॉ. रामदास आंबटकर

भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते, विधान परिषदेचे माजी सदस्य, आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे कार्यकर्ते डॉ. रामदास आंबटकर यांचं आज दुपारी महात्मा गांधी मेडिकल मिशन हेल्थकेअर सेंटरला चेन्नई येथे निधन झाले. अनेक दिवसांपासून डॉ. रामदास आंबटकर हे त्यांच्या किडनी संबंधित उपचारासाठी एमजीएम हेल्थकेअरला चेन्नई येथे उपचार घेत होते. ते विदर्भातील वर्धा जिल्ह्यातील वडनेरचे प्रतिनिधित्व करायचे. माजी आमदार डॉ. रामदास आंबटकर यांच्या निधनाचे वृत्त ऐकून अतिशय दुःख झाले. विदर्भात अखिल भारतीय विद्यार्थी परिषद आणि भाजपचे संघटन मजबूत करण्यासाठी रामदासजींनी कठोर परिश्रम घेतले. रामदास आंबटकर यांच्या निधनाने विदर्भातील सामाजिक-राजकीय क्षेत्राची मोठी हानी झाली आहे अक्षय भावना  केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी आपल्या शोक संदेशातून व्यक्त केल्या आहे.

---------------------------------------------

रॅली

पहलगाम मध्ये झालेल्या आतंकवादी हल्ल्यात निष्पाप लोकांचा जीव गेला. याचे पडसाद संपुर्ण जगभर उमटले.  भंडारा शहरात देखील सकल हिंदू संघटनेच्या वतीने शहरातून रॅली काढण्यात आली.

---------------------------------------------

आयपीएल

**आयपीएल मध्ये, आज चेन्नई सुपर किंग्ज चा सामना पंजाब किंग्जबरोबर होणार आहे. चेन्नईतल्या एम.ए चिदंबरम स्टेडियमवर संध्याकाळी साडे सात वाजता हा सामना सुरु होईल. काल रात्री, कोलकाता नाईट रायडर्स ने दिल्ली कॅपिटल्सचा १४ धावांनी पराभव केला.**

**---------------------------------------------**

**हवामान**

**आज विदर्भात अकोला इथं सर्वाधिक कमाल तापमान ४४ पूर्णक ६ अंश सेल्सियस तर नागपूरच कमाल तापमान ४३ पूर्णक २ अंश सेल्सियस इतकं नोंदवण्यात आलं येत्या काही तासात विदर्भातील अमरावती, वर्धा आणि यवतमाळ जिल्ह्यातील काही ठिकाणी वादळी वारा आणि मेघगर्जनेसह हलका पाऊस पडण्याची शक्यता आहे.**

**---------------------------------------------**